| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६८ वा | गुरूवार, दिनांक २८ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## लातूर रेल्वे स्थानकाचा कायापालट वेगात!

### पिट लाईनचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार: खासदार शिवाजी काळगे



**लातूर/प्रतिनिधी :** लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे आणि विभागीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य संजय निलेगावकर यांनी गुरुवारी लातूर रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या पिट लाईनसह विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विभागीय रेल्वे अभियंता अलुरे, स्टेशन मॅनेजर संजीवकुमार अर्धापूर, रेल्वे अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

पिट लाईनच्या कामाचा आढावा घेताना खासदार काळगे यांनी कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना अधिकार्यांना दिल्या. रेल्वे अधिकार्यांनी हे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले.

दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक २ ची लांबी आणि रुंदी वाढविण्याचे काम तसेच नव्याने उभारण्यात येणार्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ च्या प्रस्तावित कामाचीही पाहणी करण्यात आली. लातूर रेल्वे स्थानकाचा वाढता प्रवासी भार लक्षात घेता या कामांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवीन फूट ओव्हर ब्रिज आणि लिफ्टची सुविधाबैठकीदरम्यान रेल्वे अधिकार्यांनी स्थानकावर नवीन दादरा उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली. या पुलासोबतच प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्टची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सध्या लातूर रेल्वे स्थानकावर प्रवेशासाठी केवळ एकच गेट असल्याने मुंबई गाडी आल्यानंतर मोठ्या प्रमाणात



लातूर रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या विविध विकासकामांना आता गती मिळाली असून, बहुप्रतिक्षित पिट लाईनचे काम येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती खासदार शिवाजी काळगे यांनी दिली आहे.

गर्दी होते. ही समस्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दुसरे प्रवेशद्वार मंजूर केले आहे. मात्र त्यासंदर्भातील काही तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधण्याच्या सूचना खासदार काळगे यांनी दिल्या. मुरुड स्टेशनला क्रॉसिंग सुविधा देण्याची चर्चायावेळी मुरुड रेल्वे स्थानकाचा दर्जा वाढवून तेथे क्रॉसिंग सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच लातूर रेल्वे स्थानकावर महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महिला जीआरपी पोलिसांची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात पोलीस अधीक्षकांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे खासदारांनी सांगितले.

गुड्स शेडवर कव्हरचे कामही मंजूरलातूर रेल्वे स्थानकावरील गुड्स शेड प्लॅटफॉर्मवर कव्हर उभारण्याचे काम मंजूर झाले असून, ते लवकरच सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

लातूर रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी संयुक्तपणे पुढाकार घेतल्याने आगामी काळात प्रवाशांना अधिक आधुनिक आणि सुसज्ज सुविधा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मनोज जरांगे पाटील रखरखत्या उन्हात करणार बेमुदत उपोषण

**अंतरवाली/प्रतिनिधी: मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत, ३० मे पासून प्रखर उन्हात बेमुदत उपोषण करण्याची घोषणा केली आहे. देशात कुठेच झालं नाही, असे कठोर उपोषण करणार असल्याचे स्पष्ट करतान जरांगे-पाटील यांनी उष्माघातानं बळी गेल्यास त्याला सरकार जबाबदार असेल, असा इशारा दिला. उपोषणादरम्यान, मराठा समाजातील बांधवांनी अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असे आवाहन देखील जरांगे पाटील यांनी केले.**


---

**३० मे पासून रखरखत्या उन्हात उपोषण – जरांगे पाटील**

आगामी उपोषणाबाबत माहिती देण्यासाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. यावेळी मंडपात उपोषण न करता प्रखर उन्हात उपोषण करण्याची आक्रमक भूमिक मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. यावेळी ३० मे पासून रखरखत्या उन्हात उपोषण करणार आहे. उपोषणादरम्यान मेलो तर मेलो. उष्माघातानं बळी गेल्यास त्याला सरकार जबाबदार असेल. यावेळी सरकारचा नाही तर माझा तुकडा पडेल, असे जरांगे पाटील म्हणाले.

**देशात यापूर्वी झाले नाही असे उपोषण होणार – जरांगे पाटील**

उन्हात किती त्रास होईल याचा विचार करत नाही. एक तर सरकारचा तुकडा पडेल नाहीतर माझा, बाज टाकून रखरखत्या उन्हात मी यावेळी उपोषण करणार आहे. पायात काही चप्पल नसेल, अन्नपाणी नसेल, काय व्हायचं होऊ. मराठा समाजातील मुलांचा सरकारने उन्हाळा केला आहे. मराठा समाजातील बांधवांनी उपोषणादरम्यान अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असे मनोज-जरांगे पाटील पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले.



देशात यापूर्वी अशा प्रकारचे, कठोर आणि इतक्या टोकाचे उपोषण झाल्याचे आठवत नाही. तेवढ्या टोकाचं हे उपोषण होईल, असेही जरांगे पाटील म्हणाले.

**जरांगे-पाटलांनी उपस्थित केले काही प्रश्न**

मला चर्चा नको अशी भूमिका स्पष्ट करताना, ५८ लाख नोंदी निघाल्या त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार आहात का? कुणबी प्रमाणपत्र मिळालं त्यांना वैधता देणार आहात का? हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढला त्याचे प्रमाणपत्र देणार आहात का? त्याची वैधता देणार का?, असे सवाल जरांगे-पाटील यांनी उपस्थित केले. मराठा आरक्षण देताय म्हणजे काय करताय? असा प्रश्न करत मराठा समाजाची मते हवीत पण आरक्षण द्यायला नको, असेही जरांगे-पाटील म्हणाले.

**आरपारची लढाई करण्याची घोषणा**

तुमच्याकडून हल्ले केले जातात आणि आमच्याविरोधात गुन्हे दाखल केले जातात? सातारा संस्थानाचे गॅझेट लागू केले जात नाही? असा प्रश्नही जरांगे-पाटलांनी उपस्थित केले. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करायाला किती वेळ लागतो? असा सवाल त्यांनी केला. आमचा पाच पिढ्यांचा बॅकलॉग कोण भरुन काढणार? असेही पाटील म्हणाले. यावेळी आरपारची लढाई करणार असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

## नसरापूर प्रकरणातील नराधमावर २८ दिवसांत आरोप निश्चित!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील भोर जिल्ह्यातील नसरापूर अत्याचार प्रकरणातील सगळ्यात मोठी बातमी समोर आली आहे. २८ दिवसात आरोपी विरोधात आरोप निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती आहे. नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणात आरोपीविरोधात आरोप निश्चित करण्यात आली आहे. न्यायालयाकडून आरोपीविरोधात प्राईमा फेसी पुरावे असल्याचे निरीक्षण न्यायालाकडून नोदवण्यात आले आहेत. आता खटल्याची रोज सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याची



माहिती समोर आली आहे.

नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीला पहिल्यांदाच प्रत्यक्ष कोर्टात हजर करण्यात आलं होतं. कोर्टात युक्तिवाद करताना आरोपीच्या वकिलांकडून विरोध करण्यात आला, मात्र पुरावे नसल्याने आरोपीवर आरोप निश्चिती करण्यात आली. पंधरा दिवसात चार्जशीट दाखल करण्यात आलं होतं. ते सादरही करण्यात आलं होतं. त्याच चार्ज शीटवर आज सुनावणी पार पडली असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणातील लैंगिक चाचणी, सीसीटीव्ही फुटेज या सगळ्याची तपासणी पुन्हा एकदा करण्यात आली, त्याचबरोबर दोषारोप पत्राची माहिती देखील यावेळी कोर्टाला देण्यात आली या आरोपीवर आरोप निश्चिती करण्यात आली आहे. आता रोज या प्रकरणाची सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## ऊस आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. राहुल आहेर, राहुल कुल, अभिमन्यु पवार, डॉ.विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते आदी उपस्थित होते.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

### प्रभात किरणे

श्रद्धा अंधश्रद्धा न कळे फरक
ऐकून अंधाधुंदी,झाली ती मेंढरी
दु:ख दारिद्र्यत,लाचारीच जगणं
विवेकी ठेवावे मना,या तन मंदिरी
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर मो: ९७६४७ ८८२८८

## अहमदपूरात वि. दा. सावरकर यांची जयंती उत्साहत साजरी

**अहमदपूर/प्रतिनिधी:** अहमदपूर शहरातील सावरकर चौकातील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सावरकर पुतळा समिती चे अध्यक्ष माजी नगरसेवक धनंजय जोशी, नगराध्यक्ष स्वप्नील व्हते, सचिव डॉ मधुसूदन चेरेकर,सिध्दीशुगरचे संचालक अविनाशजी जाधव ,दिलीप शास्त्री, शरद जोशी,डॉ चंद्रकांत उगिले ,गोविंद गिरी , अमित रेड्डी, निखिल कासनाळे, अजिंक्य चामे, डॉ निलेश मजगे,सय्यद युसुफ,मुन्ना कांबळे, सिद्धार्थ सुर्यवंशी,लक्ष्मण




आलगुले,सुनील मजगे, शाम भगत,शिवानंद हेंगणे, ड सुहास पाटील, नाथराव केंद्रे ,संपन्न कुलकर्णी,अंनत काशीकर,मधुकर धडे,बालाजी आगलावे, प्रशांत शिंदे आदी मान्यवरांसह सर्व नगरसेवक व सावरकर प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



आसाम मध्ये समान नागरी कायदा विधेयक मंजूर..

### चिमटा दयाचा



लातूरात नवीन दिवे बसविणार तेंव्हा बसवा,आहे ते दिव पुर्ववत चालू करा! मुलभूत प्रश्नाकडे पहिल्यांदा लक्ष द्या!!

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त २९ ला इंदोरीकर महाराज यांचे किर्तन तर ३० ला विविध समाज उपयोगी कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा भाजपाचे नेते श्री. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त २९ मे २०२६ रोजी इंदोरीकर महाराज यांचे किर्तन होणार असून ३० मे जन्मदिनी अभिष्टचिंतन सोहळा व इतर सामाजिक उपक्रमाचे आयोजन भाजपा कार्यकर्त्यांसह मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा ३० मे जन्मिदिवस दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि विविध कामाच्या माध्यमातून साजरा केला जातो. याहीवर्षी मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांच्या आणि मित्र परिवाराच्या वतीने सर्वत्र विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनाच्या पूर्व संधेला २९ मे २०२६ शुक्रवार रोजी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती देशमुख इंदोरीकर महाराज यांचे औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे सायं. ७ वाजता किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

३० मे जन्मदिनी लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध गावातील ग्रामदेवतांना सकाळच्या वेळी महापूजा, अभिषेक करून आ. रमेशअप्पा कराड यांच्यासाठी दीर्घ आयुष्याकरिता कार्यकर्त्यांच्या वतीने प्रार्थना केली जाणार आहे. त्याच बरोबर विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मित्र परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे.





ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## उपाय सांगितला जात नाही.

संकट काळात जनतेला विविध आवाहने केली जात आहेत. याची काटकसर करा, त्याची करा! मात्र या बाबत उपायोजना सांगितली जात नाही. पर्याय सांगितला जात नाही. काटकसर करा म्हणजे उपाशी राहा असे होत नाही. पेट्रोल, डिझेल किंवा स्वयंपाकाच्या गॅस बाबत काटसरीचे आवाहन केले जाते. आवाहन तर केले पाहिजे. त्याबरोबर उपायोजनाही सांगितल्या पाहिजेत. गॅसला पर्याय, पेट्रोल-डिझेलला पर्याय सांगितला पाहिजे तसे पाहिले तर एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, ज्यावेळी आवाहन केले जाते, त्यावेळी त्याला पक्का पर्याय हाती दिला पाहिजे. जसे इलेक्ट्रिक गाड्या हा एक पर्याय आहे. जरी राज्यात विद्युत वीजेची कमतरता भासली तरी पुढेच्या पुढे बघू, मात्र सध्याला इलेक्ट्रिक दोन व चाकी गाड्या हा पर्याय आहे. त्याच प्रमाणे इलेक्ट्रिक शेगडी वापरणे परवडणारे नाही. एक तर वीजेचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. वीज नियमित मिळत नाही. शेतकऱ्यास रात्री वीज दिली हाते. खाजगी वीज पुरवठा करणाऱ्या कंपन्याकडून वीज मिळते, मात्र इतराकडून काय स्थिती आहे याची झळ बसत आहे, तो त्रास सध्याला दिसून येत आहे. भोगत ही आहोत. असो, सध्याला संकटावर चर्चा होते मात्र यावर मात कशाप्रकारे करायाची हे सांगितले जात नाही. आपला देश विकासाबाबत काही बाबतीत मागे आहे हे मान्यच केले पाहिजे. आपल्यापेक्षा इतर देश पुढे आहेत. जपान, जर्मन, चीन, रशिया, अमेरिका, इटली असे किती तरी नावे समोर येतात. आपणच मागे का आहोत? विचार करायाला हवा, आपण मागे का आहोत तर आपल्याला पर्याय दिला जात नाही. वीजेसाठी किंवा इंधनासाठी सर्वोत्तम पर्याय सौरऊर्जे चा वापर आहे. या बाबतचे उपकरण मोफत दिले पाहिजे. प्रत्येक कुटुंबाला स्वस्तात उपकरणे दिली पाहिजेत. त्याच प्रमाणे इलेक्ट्रिक गाड्या या माफक दरात जनतेला उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अगोदर इलेक्ट्रिक गाड्याला लागणारे रॉ-मटेरियल आपल्या भारतात बनविले पाहिजे तरच स्वस्तात गाड्या पुरविल्या जावू शकतात. नसता काय होते एक म्हण आहे 'अंगापेक्षा बोंगा जास्त' त्यामुळे सरकारने केवळ हे करा. काटकसर करा. आदि सुचना देत आहे. ह्या सूचना पाळायाच्या कोणी तर जनसामान्य-गोरगरीबांनी! बाकीचे आजही मोठी मंडळी, आता मोठी मंडळी कोणाला म्हणायाचे हे सर्वांना माहिती आहे. आजही त्यांच्या पाठीमागे गाड्याचा ताफा दिसून येतो. त्याला निर्बंध नाही. हे दिसून येत नाही का? आज पर्यंत जसे पंतप्रधान यांनी जनतेला आवाहन केले तसे जनता काही प्रमाणात वागत आहे. काटकसर करीत आहे. गॅसची सबसिडी सोडा असे म्हणतात गोरगरीब, जनसामान्यांनी सोडली मात्र मोठ्यांनी नाही. तसेच आता पंतप्रधनाच्या आवाहनास गोरगरीब जनसमान्या पाठींबा देतात, मात्र मोठी मंडळी देत नाहीत हे दिसून येते. त्यामुळे एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, केवळ आवाहन करून चालणार नाही तर पर्याय हाती देणे आवश्यक आहे. इंधन नाही तर सौरउर्जेचा वापर करून अन्न शिजवावे. सौरउर्जावर चालणाऱ्या गाड्या स्वस्तात दिल्या पाहिजेत. बॅटऱ्या हया माफक दरात पुरविल्या पाहिजेत. जगात अनेक देश सौरउर्जेचा वापर करीत आहे. भारतात तर कडक उन्ह आहे. उष्णता अधिक असते. सौरउर्जेचा वापर अधिक प्रमाणात घेता येवू शकतो, आलेले इंधनाचे संकट परतावु शकतोत. ही बाब लक्षात घेता या बाबत कठोर पावले उचलली जात नाहीत. हे दुर्दैव आहे. काही झाले तरी आता कठोर निर्णय व पर्याय शोधावे लागतील. उपदेश न करता उपायोजना सांगावी. काय केल्यास इंधनावरील संकट दूर होईल हे सुचवावे. केवळ मार्गदर्शन करून चालणार नाही. आता पर्यंत मार्गदर्शन गोरगरीब व जनसामान्यांनी स्विकारले आहे. ज्यांनी स्विकारले नाही त्यांच्या बाबत काय केले? मोठी मंडळी किती दुरपयोग करीत आहे. आर्थिकस्थितीचा निधी कोणावर खर्च होतो. भत्ते, मोफत आदि बाबीची सवलती बाबत एकदा गंभीरतेने विचार केला पाहिजे. उठसुठ जनसामान्य गोरबरीबांना वेठीस धरणे योग्य नाही. अमेरिका इराशी लढत आहे. युद्ध चालू आहे. इंधनाचा पुरवठा होत नाही. होर्मुजमधून इंधनाचे जहाज आणणे कठिण आहे. जे संकटे येत आहेत ते सर्वांना माहिती आहेत. इंधना बाबत परावलंबी आहोत याची जाण आहे. असे असताना संकट गडद आहे याची आठवण वारंवार करून देण्याबरोबर उपायोजना सुद्धा सांगितली पाहिजे. वास्तविक वीजेचे संकटावर मात करण्यासाठी किती घरावर सौरउर्जेचे पॅनल बसविली आहेत. शेतीसाठी सौरपंप किती बसविली आहेत. कागदपत्रावर नोंद सांगण्यापेक्षा किती प्रत्यक्षात अमल झाला याची माहिती जनतेला दिली पाहिजे. इतर देश इंधनाचा किंवा गॅसचा वापर अत्याल्प करीत आहेत. मोठ्या प्रमाणात सौरउर्जेचा वापर करीत आहेत. त्याचे तरी आवलोकन केले पाहिजे. भारतीय इतरांना सांगण्यात पटाईत आहेत मात्र स्वत:होवून अमल करीत नाहीत. एक म्हण भारतीयासाठी आहे ती म्हणजे 'इतरांना सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषण' अशी स्थिती दिसून येते. मुळात इंधनाचा वापर कमी करावा? कसा कमी करावा, याबाबत पर्याय व प्रबोधन केले पाहिजे. प्रत्येकाची या बाबत जबाबदारी आहे. प्रत्येकांनी विचारपुर्वक वागण्याची गरज आहे. सर्वांनी नियमाने चालण्याची गरज आहे. शासनाला सहकार्य करण्याची गरज आहे. आजही विनाकारण गाड्याघेवुप फिरणारे सापडतील. जनतेच्या आगोदर शासन व प्रशासनाने पंतप्रधानाच्या सुचनाचे पालन करावे. सरकारमधील व्यक्तींनी पालन केले पाहिजे, त्यानंतर त्यांचे अनुकरण इतर जनता निश्चित करेल. केवळ सर्व बाबी जनतेवर लागदण्या अगोदर विचार केला पाहिजे. जनतेला पर्याय द्या. सौरउर्जा असो किंवा इंधनाबाबत पर्याय जनतेच्या हाती सोपवा मगच यात यशस्वीता निर्माण होईल. संकटावर यश मिळवायाचे झाले तर पहिल्यांदा सर्वांनीच सकारात्मक प्रयत्नाची मोठी गरज आहे. केवळ जनसामान्य व गोरगरीबाकडून अपेक्षा व्यक्त करून त्यांच्याकडूनच अमल करून घेणे हे योग्य नाही. त्यामुळे या बाबत विचार करा. पर्याय हाती द्या. आतापासून मार्ग शोधा, संकट दिर्घ काळ आहे हे लक्षात घेवून वाटचाल होणे अपेक्षित आहे.

# तंबाखूला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार




आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने प्रगती करत असताना दुसऱ्या बाजूला तंबाखूचे वाढते व्यसन समाजासमोर गंभीर आरोग्य संकट निर्माण करत आहे. गुटखा, पानमसाला, खर्रा, सिगारेट, बीडी तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन युवकांपासून प्रौढांपर्यंत चिंताजनक गतीने वाढताना दिसत आहे. या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी ३१ मे हा दिवस 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी 'खोट्या आकर्षणाचा पर्दाफाश - निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाला चोख प्रत्युत्तर' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित केवळ जनजागृती न करता, समाजामध्ये तंबाखूविरोधी एक व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तंबाखू हे केवळ क्षणिक आनंदाचे व्यसन नसून ते तोंडाचा, घशाचा व फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि स्ट्रोक यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचे मूळ कारण ठरत आहे.

या गंभीर आव्हानाचा सामना करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात जनजागृती, समुपदेशन, व्यसनमुक्ती सेवा आणि कायद्याची अंमलबजावणी या चहुबाजूने प्रभावी कामगिरी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १७ तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्रातून एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ५,७६३ रुग्णांची नोंदणी करण्यात आली, ज्यापैकी ९८४ नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन पूर्णपणे सोडण्यात यश मिळवले आहे. ही आकडेवारी व्यसनमुक्तीच्या दिशेने पडणारे एक आशादायक पाऊल मानली जात असली, तरी दुसरीकडे राबविण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत ७१३ संशयित रुग्णांपैकी ४२ जणांमध्ये कर्करोगाचे झालेले निदान समाजासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारे ठरले आहे.

तरुणाईला या जीवघेण्या विळख्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी शैक्षणिक आणि आरोग्य संस्थांमध्ये विशेष उपक्रम राबवून जिल्ह्यात ११७ तंबाखूमुक्त शाळा आणि ५३६ तंबाखूमुक्त आरोग्य संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. शाळा परिसरात तंबाखू विक्रीला प्रतिबंध करण्यासोबतच विविध व्याख्याने, सामूहिक शपथ आणि पोस्टर मोहिमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत आहेत. केवळ प्रबोधनावर न थांबता, कोटपा (COTPA 2003) कायद्यांतर्गत पोलीस, आरोग्य आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे मोठी मोहीम उघडली आहे. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५६१ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामध्ये आरोग्य विभागाने ४,६७,००० रुपये, पोलीस विभागाने १,९२,००० रुपये आणि अन्न व औषध प्रशासनाने ३४,००० रुपयांची दंडवसुली करत कायद्याचा कडक बडगा उगारला आहे.

धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीमुळे त्याच्या आसपास वावरणाऱ्या लहान मुलांच्या, महिलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्याला निर्माण होणारा 'पॅसिव्ह स्मोकिंग'चा धोका लक्षात घेता हा लढा आता केवळ प्रशासकीय न राहता समाजाची सामूहिक जबाबदारी बनला आहे. पालक, शिक्षक, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन तरुणांना योग्य दिशा देणे ही काळाची गरज आहे. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी १८००-११-२३५६ हा मोफत समुपदेशन टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून नागरिकांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे. 'तंबाखूला नकार आणि निरोगी जीवनाचा स्वीकार' करत सशक्त राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक कोल्हापूरकराने या व्यसनमुक्तीच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे हेच या जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे खरे उद्दिष्ट ठरेल. जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आरोग्य, पोलीस व अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**- राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष कोल्हापूर**

# 'इंडियन ऑईल'च्या सीएसआर उपक्रमातून कूपर रुग्णालयास बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



**मुंबई/प्रतिनिधी :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना अधिक जलद, अचूक आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) च्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत जुहू येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ. आर. एन. कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयात पूर्णपणे स्वयंचलित अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबत सांगितले आहे की, राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य आहे. कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक रुग्णालयांना अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची जोड मिळत असल्याने आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होत आहे. यामुळे रुग्णांना जलद आणि अचूक सेवा देण्यास मदत होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे आधुनिकीकरण वेगाने सुरू असून, हा उपक्रम त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या अत्याधुनिक यंत्रणेमुळे रुग्णालयाच्या निदान क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. मोठ्याप्रमाणात रक्त तपासण्या अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार आहेत.

नियमित तसेच तातडीच्या बायोकेमिकल चाचण्या कमी वेळेत पूर्ण होणार असल्याने डॉक्टरांना त्वरित वैद्यकीय निर्णय घेणे अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, रुग्णांना उपचार लवकर सुरू करण्यास मदत मिळणार असून आरोग्यसेवेची गुणवत्ता उंचावणार आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांतील हजारो रुग्णांसाठी डॉ. आर. एन. कूपर रुग्णालय हे महत्त्वाचे सार्वजनिक आरोग्य केंद्र मानले जाते. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिक मोठ्या प्रमाणावर या रुग्णालयावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझरची उपलब्धता ही सार्वजनिक आरोग्यसेवेला मोठा आधार ठरणार आहे.

या उपक्रमामुळे प्रयोगशाळेतील कार्यपद्धती अधिक कार्यक्षम होणार असून अहवालांचा 'टर्नअराउंड टाइम' लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नमुन्यांचे विश्लेषण अधिक अचूकपणे करता येणार असल्याने उपचार प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीच्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात सातत्याने करण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे सार्वजनिक आरोग्य संस्थांची क्षमता वाढत असून, नागरिकांना अधिक सक्षम व विश्वासार्ह वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहे.

# महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कलावैभवाचा हरियाणात ४ आणि ५ जून रोजी अविष्कार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची समृद्ध लोकपरंपरा, वैविध्यपूर्ण लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलावैभव राष्ट्रीयस्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने 'लोकायन लोकोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे हरियाणातील गुरुग्राम येथे ४ व ५ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आणि 'लोकायन सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, मुंबई' यांच्या सहयोगाने हा दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळा पार पडणार आहे. गुरुग्राम येथील एसजीटी युनिव्हर्सिटीत ४ व ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. या लोकोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध पारंपरिक; तसेच प्रयोगात्म लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

राज्याच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोककला जतन व संवर्धनाचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील नामांकित लोककलावंत यात सहभागी होऊन पारंपरिक लोकनृत्य, लोकसंगीत, पोवाडे, भारूड, गोंधळ, लावणी, दिंडी, लोकनाट्य, आदिवासी लोककला; तसेच आधुनिक प्रयोगशील लोककलांचे सादरीकरण करणार आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीतील जीवनमूल्ये, परंपरा, लोकसंवेदना आणि सामाजिक आशय या कलाविष्कारांतून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहेत.




'लोकायन लोकोत्सव' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा एक वैचारिक आणि कलात्मक उपक्रम ठरणार आहे. विविध कलाप्रकारांमधून भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सामाजिक समरसता आणि लोककलांचे जतन या मूल्यांचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार, यांच्या संकल्पनेतून; तसेच सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील लोककला राष्ट्रीयस्तरावर सादर करून कलावंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नव्या पिढीला लोकपरंपरांशी जोडणे आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट करणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. गुरुग्राम येथील रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अनोखा अनुभव या निमित्ताने घेता येणार आहे.या सांस्कृतिक महोत्सवाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोककला आणि लोकसंस्कृतीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ८९ हजार कोटींच्या गुंतवणुकीला चालना मिळणार

## पाच अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन: देवेंद्र फडणवीस

### उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री यांची मंजुरी



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन ॲण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्ह्ज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

या विशाल प्रकल्पांमुळे केवळ गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच वाढणार नाही, तर स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

# विद्येशिवाय जीवनच व्यर्थ

शिक्षणबोध : संदीप वाकचौरे

अलीकडे शिक्षणाचा मूलभूत अर्थ मुळात हरवत चालला आहे. स्वतःच्या गरजेप्रमाणे शिक्षणाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. एकीकडे माहितीलाच विद्या म्हटले जात आहे. मार्कांचा उंचावलेला आलेख म्हणजे विद्या. परीक्षेत अधिकाधिक उत्तराच्या दिशेने माहिती ओकत राहणे म्हणजे विद्या असे मानले जात आहे. अधिकाधिक पैसे मिळून देते ती खरी विद्या असे म्हणण्यापर्यंत विद्येचा दर्जा खालावण्याचा प्रयत्न वर्तमानात केला जात आहे. विद्या म्हणजे केवळ माहिती नाही किंवा पुस्तकाशी संबंधित आशय म्हणून जे ज्ञान मानले जाते ते देखील नाही. विनम्रता, उपकार, उपदेश आणि समाजहिताच्या दृष्टीने विचारांचा संगम म्हणजे विद्या. आपल्याला परीक्षेत किती मार्क मिळाले त्यावर तुमच्या विद्येचा दर्जा, स्थान अवलंबून असत नाही. मानवी जीवनात पैसे मिळवून देते ती काही विद्या नाही. जीवन परिवर्तनाची वाट दाखवते ती विद्या; मात्र मानवी जीवनात उत्थान घडवण्याच्या दृष्टीने विद्या हीच खरी संपत्ती आहे. महात्मा जोतिबा फुले यांनी विद्येचे मोल आपल्या अखंडामध्ये अत्यंत सुस्पष्ट शब्दांत सांगितले आहे. विद्येविना मती गेली असे सांगत विद्येच्या अभावी जीवनात कितीतरी अपयशाचे मार्ग अनुसरावे लागतात. त्यामुळे विद्येचा प्रभाव आणि परिणाम ज्यांना अनुभवास येतो त्यांना विद्येचे मोल सहजतेने लक्षात येते. त्यामुळे मानवी जीवनाच्या उत्थानाचा विचार करता विद्या हीच खरी शक्ती आहे हे लक्षात घ्यायला हवे. विद्या हीच मानवी जीवनासाठीची खरी शोभा आहे. विद्या हाच मानवी जीवनातील दुःखापासून खर्या मुक्तीचा मार्ग आहे. विद्येशिवाय जीवनात कशालाही अर्थ नाही. जीवनाचे मोल समजून घ्यायचे असेल, तर प्रत्येकाने विद्येची वाट अनुसरण्याची गरज आहे.

प्रकाशाचा मार्ग

आज विद्या प्राप्त असलेली माणसे समाजात अधिकाधिक आदराला पात्र असायला हवीत; मात्र अलीकडच्या काळात विद्या म्हणजे सरस्वतीच्या उपासकांची प्रतिष्ठा हरवताना दिसते. त्याचवेळी लक्ष्मीच्या उपासकांची प्रतिष्ठा उंचावते. विद्या हाच एकेकाळी प्रतिष्ठेचा मार्ग होता. आज तो मार्ग अत्यंत अरुंद होत चालला आहे. हा मार्ग अधिक अरुंद होत जाणे याचा अर्थ आहे मानवी जीवनाचा र्हास होत जाणे आहे. शिक्षण आणि शिक्षण घेणार्या पदवीधारकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे हे खरेच; पण शिक्षण घेऊन पदवीधर होताना विद्या प्राप्त करणारी माणसे मात्र कमी होत चालली आहे. मुळात विद्येचा मार्ग ही साधना आहे. ती साधना आपण कशी करतो त्याला अधिक मोल आहे.

माणसांच्या जीवनात शिक्षणामुळे परिवर्तनाची वाट सापडत असते. विद्या म्हणजे जीवनातील अंधकारापासून मुक्ती आणि जीवन प्रकाशाचा मार्ग असतो; मात्र आज विद्या म्हणजे शिक्षण घेणारे आणि विद्यापासून दूर असणारी अर्थात अशिक्षित असलेल्या माणसांमध्ये कोणताच फरक दिसत नाही. याचा अर्थ आहे शिक्षण घेऊनही विद्या प्राप्त होतेच असे घडत नाही. कारण शाळा-महाविद्यालये ही तर फक्त माहितीचीच केंद्रे बनली आहेत. तेथे विद्येचा मार्ग नाही. त्यामुळे समाजात लहान माणसांच्या सावल्या अधिक उंच पडू लागल्या आहेत. त्यामुळे शिक्षण आप-ोआपच अर्थहीन बनत चालले आहे. शिकलेली माणसे अधिक लबाड असल्याचे समाजात अधोरेखित होते. शिकलेली माणसेच अधिक भ्रष्ट, लबाड, भामटी आणि विश्वासघातकी असल्याचे प्रतिबिंबीत होताना दिसते आहे. एका अर्थाने विद्येचा मार्गच अनुसरला जात नसल्याने जीवनात परिवर्तनाची वाट सापडताना दिसत नाही. जी वाट डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सापडली होती, त्या वाटा अलीकडच्या काळात चालणे फारसे घडत नाही.

मुळात अलीकडे शिक्षणाचा पूर्णतः बाजार झाला आहे. शिक्षणात विद्यार्थी हा ग्राहक झाला आहे आणि शाळा, शिक्षक विक्रेते झाले आहेत. शिक्षणासाठी पैसा मोजला जातो. शिक्षण पैसे देऊन घेतले जात असल्याने तेथे शिक्षणासाठी धडपडणार्या शिक्षकांविषयीची आत्मीयता संपुष्टात आली. शिक्षकांचे कर्मचार्यात रूपांतर झाले आहे. त्यामुळे असलेली बांधिलकी आणि नाते काहीसे सैल होत चालले आहे. अनेकदा शिक्षणासाठी पैसा ओतला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या मनात अहंकाराचे



पोषण होताना दिसते. त्यामुळे शिक्षणातून अहंकार नष्ट होण्याची गरज असताना, अलीकडे अहंकाराचे पोषण आणि भरण होताना दिसत आहे. शिक्षणातून अहंकार संपुष्टात येण्याची गरज असताना, अलीकडे शिकलेली माणसेच अधिक अहंकारी बनलेली आपल्याला दिसत आहेत. समर्थ रामदास स्वामी हे आपल्या दासबोधातील अनेक श्लोकांच्या माध्यमातून नेमके शिक्षण म्हणजे काय, विद्यार्थ्यांचे कर्तव्य कोणते आहे, शिक्षकांची भूमिका काय असायला हवी? या संदर्भाने विवेचन करत आहेत. समर्थ रामदास स्वामी सांगत आहेत की, शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी अहंकार न ठेवता, संपूर्ण शिक्षण व्यवहार आणि तेथे कार्यरत असलेल्या माणसांसोबत विनम्रतेने व्यवहार करायला हवा. मुळात विनम्रतेचा विचार असल्याशिवाय ज्ञानाचे ग्रहण होण्याची शक्यता असत नाही. शिक्षणाच्या प्रक्रियेत कार्यरत असलेल्या प्रत्येक माणसाच्या नात्यातील वीण हवी. त्याचबरोबर विद्यार्थी, शिक्षक, समाज यांच्यातील नाते नम्रतेवर आधारित असावे. आई आणि मुलगा यांच्या नात्यात कितीतरी गोडवा असतो. तो गोडवा एकप्रकारे स्नेहबंधच असतो. त्यामुळे तो आपण किती विकसित करतो त्यावर बरेच काही अवलंबून असते.


प्रश्न विचारणे हरवलेज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने शिक्षणाच्या प्रक्रियेत काही घडायला हवे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेत ज्ञान मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे घडायला हवे आहे. आज आपल्या शिक्षणात प्रश्न विचारणे हरवले आहे. प्रश्न जसे विचारणे घडत नाही, त्याप्रमाणे प्रश्न पडतील अशी व्यवस्था शिक्षणातून उभी राहताना दिसत नाही. प्रश्नांची देवाणघेवाण ही एक प्रकारे ज्ञानाची वाट असते. प्रश्न पडणारे आणि विचारणारे विद्यार्थी ज्या शिक्षण व्यवस्थेत निर्माण केले जातात, त्या शिक्षण व्यवस्थेतून लोकशाहीला बळ मिळण्यास मदत होत असते. प्रश्न न विचारणारी माणसे आपण घडवली, तर ती पिढी ही केवळ मुकी बिचारी कोणी हाका अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. त्याचवेळी प्रत्येक विद्यार्थ्याने शिकण्याची तयारी ठेवणे, गुरुजनांचा आदर करणे आवश्यक आहे. शिक्षणातून आदर मिळायला हवा यात शंका नाही; मात्र तो आदर विद्यार्थ्यांनी द्यायला हवा हेही खरे; पण त्याचवेळी विद्यार्थ्यांचा देखील सन्मान राखण्याची गरज आहे. आपल्याला प्राप्त होणारी विद्या ही काही स्वतःपुरती असता कामा नये, कोणत्याही विद्येच्या अंगी उपकाराची भावना असते. मुळात आपल्याकडे जे ज्ञान, विद्या आहे तिचा उपयोग इतरांच्या कामी येते आहे का? याचा शोध घेण्याची गरज आहे. आपणास प्राप्त असलेली विद्या केवळ स्वतःपुरती न ठेवता समाजाच्या उपकारासाठी वापरावी. त्यातून समाजहित साध्य होत असेल, तर ती विद्या आहे, अन्यथा आपल्याकडे असलेल्या विद्येचे स्वरूप हे माहितीचेच आहे असे समजावे.

दुर्बल घटकांना न्याय

शिक्षणाने समाजातील अज्ञान, अन्याय आणि विषमता दूर व्हायला हवी. विद्या प्राप्त झाली, तर काय घडते हे आपल्या देशाने खूप जवळून अनुभवले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या बळावर समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून दिला. त्यांनी निर्मिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील गरिबांचे, दीन, दलितांचे उत्थान घडले आहे. अनेकांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला आहे. अनेकांना समाजात स्थान निर्माण करता आले आहे. विद्या असेल, तर अशा स्वरूपाची वाट चालणे घडायला हवे. विद्या म्हणजे जीवनासाठी योग्य मार्गदर्शन. समाजातील जे-जे विद्येची वाट चालतात, मग त्यात शिक्षक, विद्वान किंवा जाणकार व्यक्तीने आपले ज्ञान इतरांना सांगायला हवे. त्यांनी समाजातील सर्वच समूहाला त्यांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. ज्याच्याकडे विद्या आहे, त्याने समाजाला प्रबोधन, उदबोधन करण्याची गरज आहे. अर्थात उपदेश म्हणजे केवळ शब्द नव्हे, तर आ-चरणातून दिलेले मार्गदर्शन असायला हवे आहे. अन्यथा शब्दांद्वारे दिले जाणारे मार्गदर्शन म्हणजे शब्दांचे बुडबुडे ठरण्याची शक्यता आहे. शब्दाला मोल तर तेव्हा येत असते, जेव्हा शब्दांप्रमाणे कृती करणारी माणसे असतात. कारण शिक्षणाचा अंतिम उद्देश समाजहित साधणे हाच आहे. विद्या ही केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी, स्वहितासाठी नव्हे, तर इतरांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी असायला हवी. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून समाजावर उपकार केले. ज्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता अशा अनेक माणसांच्या दारी शिक्षणाची गंगा त्यांनी नेली.

विद्या प्राप्त असलेली माणसे अधिक विनम्र असतात. त्यांच्या अंगी कोणत्याही प्रकारे अहंकाराचे भरण होत नाही. त्याउलट शिक्षण हे अहंकार मुक्तीचे साधन आहे. त्यामुळे आपण अहंकारी असू तर समजायचे, की आपल्याकडे विद्या नाही, तर केवळ माहिती आहे. अहंकार असेल, तर ती माणसे शिकलेली असली, तरी ते अशिक्षित असेच समजावे यात शंका नाही. अर्थात विद्या तर त्याला प्राप्त करायची असेल, तर विद्यार्थ्यांच्या अंगी विनम्रता असायला हवी. अर्थात जो विनम्र असेल असा विद्यार्थीच खर्या अर्थाने विद्वान होतो. ज्ञानाचा गर्व न करता त्याचा उपयोग इतरांना मदत करण्यासाठी करणे हेच शिक्षणाचे सौंदर्य आहे. त्यामुळे विद्या ही समाजाच्या प्रगतीची साधन आहे. विद्या आणि उपदेश हे शिक्षकाचे कार्य आहे, पण उपदेश करणे म्हणजे केवळ माहिती देणे नाही, तर जीवनमूल्ये शिकवणे. उपदेश म्हणजे योग्य मार्ग दाखवणे. शिक्षणाने व्यक्तीला विवेक, नैतिकता आणि जबाबदारीची जाणीव होते. विद्या आणि समाजहित शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी किंवा वैयक्तिक यश नसून समाजाच्या उन्नतीत योगदान देणे आहे. विद्या ही समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि विषमता दूर करण्याचे साधन आहे. आजच्या काळात शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे; पण समर्थ रामदास विद्येचे मोल नमूद करत आहेत. विद्या ही समाजहितासाठी असावी. डॉक्टरांनी आपले ज्ञान रुग्णांच्या सेवेसाठी वापरावे. अभियंत्यांनी समाजाच्या गरजा लक्षात घेऊन तंत्रज्ञान विकसित करावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार करावे. समर्थ रामदासांचा हा श्लोक आपल्याला सांगतो, की विद्या ही विनम्रतेने ग्रहण करावी, समाजाच्या उपकारासाठी वापरावी, योग्य मार्गदर्शन करावे आणि समाजहितासाठी अर्पण करावी. यातून स्पष्ट होते, की शिक्षणाचा उद्देश केवळ वैयक्तिक प्रगती नसून समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान देणे आहे. त्यामुळे आपल्याला खरोखर शिक्षणाचा विचार करायचा असेल, तर ते शिक्षण समाज व राष्ट्रहिताचा विचार करायला भाग पाडते आहे. समर्थ रामदास म्हणतात की, विद्या विनंती करावी। विद्या उपकार करावी। विद्या उपदेश करावा। विद्या उपकार करावा।। हा विचार घेऊन शिक्षणाची वाट गतिमान करण्याची गरज आहे. शिक्षण घेऊनही आपण राष्ट्रासाठी कोणतीच वाट चालणार नसू, तर त्यातून आपले काही साध्य होण्याची शक्यता नाही आणि असे शिक्षण घेणार असू, तर असे शिक्षण कुचकामी आहे. त्यामुळे जीवनात शिक्षणाची इयत्ता पुढे जात असताना सतत लक्षात घ्यायला हवे, की आपण खरोखर विद्येची वाट चालतो आहोत का? अन्यथा अहंकाराने युक्त, विनम्रता शून्य आणि केवळ अक्षर साक्षरतेचे शिक्षण नसले तरी चालेल. कारण या वाटेचे शिक्षणाने कोणाचेही भले होण्याची शक्यता नाही. त्यामुळे आपणच ठरवायला हवे, की आपल्याला कोणत्या वाटेने प्रवास करायचा आहे.

## संत कबीर :हिंदू-मुस्लिमांना ऐक्याचा संदेश देणारे महान संत



संत कबीर हे १५ व्या शतकातील महान भक्ती कालीन कवी, समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ होते. त्यांनी सगुण भक्तीपेक्षा निर्गुण ब्रह्माची उपासना केली आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. त्यांच्याबद्दलची महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:जन्म: इ.स. १३९८ मध्ये वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे एका गरीब विणकर कुटुंबात झाला.गुरु: ते थोर संत रामानंद यांचे शिष्य होते.कार्य: त्यांनी कर्मकांड, अंधश्रद्धा आणि जातीपातीवर कडक शब्दांत टीका केली. प्रेमाच्या आणि मानवतेच्या शिकवणीवर त्यांनी भर दिला.साहित्य: त्यांच्या उपदेशांना 'दोहे' (कबीर के दोहे) म्हटले जाते. त्यांची वचने 'बीजक' (इळक्षरज्ञ) या ग्रंथात संकलित केली आहेत.निर्वाण: इ.स. १५१८ (काही मतानुसार १५९८) मध्ये उत्तर प्रदेशातील मगहर येथे त्यांचे निधन झाले.

***दोहा १:****पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ, पंडित भया न कोय।ढाई आखर प्रेम का, पढ़े सो पंडित होय।।अर्थ: पोथ्या-पुराणे वाचून जग संपले, पण कोणीही खरा ज्ञानी बनला नाही. ज्याने प्रेमाची खरी भाषा शिकली, तोच खरा ज्ञानी (पंडित) होय.*

## मुलींसाठी सुंदर दिसण्यासाठी

मुलींसाठी सुंदर आणि आकर्षक दिसण्याच्या सर्वात प्रभावी टिप्स म्हणजे चेहऱ्यावर नियमित क्लिंझिंग-टोनिंग-मॉइश्चरायझिंग (उढच्) रूटीन पाळणे, पुरेसे पाणी पिऊन त्वचा हायड्रेट ठेवणे, आणि आत्मविश्वास वाढवणारी साधी पण सुटसुटीत हेअरस्टाईल व कपड्यांची निवड करणे.१. त्वचेची काळजी (ड्ज्ञळपलरीश ढळींी)ग्लोइंग स्किन: रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्याला कोरफड (-श्रे-शींशिर) जेल लावून झोपा. यामुळे सकाळी चेहरा फ्रेश आणि तुकतुकीत दिसतो.नॅचरल फेस पॅक: कच्च्या दुधात बटाट्याचा रस मिसळून लावल्याने चेहऱ्यावरील काळे डाग दूर होऊन चमक येते. हायड्रेशन: दिवसभरात किमान ३ ते ४ लिटर पाणी प्या. यामुळे त्वचा कोरडी पडत नाही आणि नैसर्गिक तेज टिकून राहते.२. आकर्षक फॅशन आणि स्टाईल (त्र्रीहळेप ढळींी)डेनिम जॅकेट: पांढऱ्या टी-शर्ट किंवा शर्टवर हलक्या निळ्या रंगाचे डेनिम जॅकेट घातल्यास एकदम कुल आणि स्टायलिश लूक मिळतो.कपड्यांची निवड: लाल, काळ्या किंवा पांढऱ्या रंगाच्या कपड्यांमध्ये व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी दिसते. तसेच आपल्या 'बॉडी टाईप'नुसार कपड्यांची निवड करा.ॲक्सेसरीज: गळ्यात एख-ादी नाजूक डिझाईनची चेन किंवा हातात ब्रेसलेट घातल्याने लूक पूर्ण होतो.३. हेअरस्टाईल आणि मेकअप कमी मेकअप: नैसर्गिक सौंदर्य खुलवण्यासाठी हेवी मेकअपऐवजी फक्त लिप बाम आणि काजळाचा वापर करा.हेअरस्टाईल: जर केस मोकळे ठेवायचे नसतील, तर एक साधा 'मेसी पोनीटेल' किंवा 'फ्रेंच रोल' करून तुम्ही स्वतःला एक आकर्षक रूप देऊ शकता..झोप: रात्री ७ ते ८ तासांची गाढ झोप घेणे सुंदर त्वचेसाठी अत्यंत गरजेचे.



### १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




फ्लॅव्होनाईडयुक्त आहाराचे सेवन तसेच व्यायाम यांच्या मदतीने ही समस्या २१ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. त्यामुळे आपल्या आहारात फळांचा अधिक समावेश करायला हवा.काही संशोधकांच्या मते, भूमध्य समुद्राच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या पद्धतीनुसार आ-हार घेतल्यास त्याचा फायदा होऊ शकतो. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष **(क्रमशः)**

### २ Joke विनोद




माझ्या घरात मी बॉस आहे असे म्हणणारा पुरुष दुसऱ्या बाबतीतही खोटे बोलू शकेल हे लक्षात ठेवा.

### ३ Message संदेश



Air hostess to Lalu Yadav:
Sir, R U Vage or Nonvage??
Lalu : Ka matlab:
Air hostess :
Sir Mera matlab hai,
Aap Shakahari hen Ya Masa-hari?? Lalu : Huttt sasuri..
I am Bihari..

### ४ Thought सुविचार



सर्वात जास्त आनंद कोणत्या गोष्टीत असेल तर दुसऱ्यांना आनंद देण्यात.
- कवि वर्डस्वर्थ


**सुभाषित**

**अभ्यावहति कल्याणं विविधं वाक्**
**सैव दुर्भाषिता राजन्ननर्थायोपद्यते ।।**

(उद्योगपर्व, अध्याय ३४, श्लोक ७७ महाभारत)

अर्थ - वाणीने चांगले भाषण केले असता त्यापासून अनेक प्रकारे कल्याण होते परंतु दुर्भाषण केले असता तीच वाणी अनर्थाला कारण होते.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. गुन्हा
५. करमणूक करणारे
८. सडपातळ
११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी!
१२. गुजराथी नृत्य प्रकार
१४. वर्तुळ
१६. भरभराट
१९. मुरली, बासरी
२०. धोबी
२१. सैन्यातील एक हुद्दा
२३. घागरा
२४. बर्फाचा पर्वत
२५. अभय देणे
२७. श्रीमंत
२८. वहिवाट, शेत
२९. संपणे
३०. चुकीचे
३१. करार, भिस्त
३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी
३५. स्वच्छ
३७. घर
३९. विपत्तीची कहाणी
४१. कणसातील दाणे
४३. सज्जनगडचे संत
४४. सार, अर्थ
४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी
४६. वर-वधू
४८. सरहद्द
४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला
५३. युद्ध
५५. लहान
५६. वेल
५८. जादू, भ्रम
५९. बाळाची बोलगाणी
६३. अतिशय हाल
६५. पावसाची झड
६६. राज्यघटना (हिंदी)
६७. गेरु
६८. पडते घेणे
७०. माया, प्रेम
७१. विविध
७३. संध्याकाळ
७४. हनुमान
७५. झकास, सुंदर
७६. राजकारणी यात्रा!
७७. रड्या माणूस
७८. मौल्यवान साठा

### उभे शब्द

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत
२. राजाचा कालावधी
३. मोठ्ठीच गंमत,४. ऐट, दिमाख
५. वर्ण,
६. सोन्याचा धागा
७. '--- में हड्डी'
८. रस्ता, पर्थ
९. जिवलग मित्र
१०. समशेर
१३. लोकांचा समूह
१५. नवरा
१७. रत्न
१८. सूर्य, तापविणारा
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. सामान
२४. थंडीचे दिवस
२५. प्राण
२६. आशीर्वाद
२७. सावकार, श्रीमंत
२८. उत्तराधिकारी
२९. शाब्दिक हजामत
३२. दरवाजा
३३. हालचाल
३४. खरकट्याची रास
३६. पळून गेलेला
३८. हिंदीत दहा
४०. ओटा
४२. कर्ण
४४. तमाशा कलाकार
४७. उगाच भटकणे
४९. हस्त
५०. सर्वस्व
५१. भोळा (शंकर)
५२. लोखंडी वस्तूवरील गंज
५४. अभिप्राय
५७. चंद्र
५८. ममता, प्रेम
६०. डोंगर उतरण, ढाळ
६१. डासाचे चावणे
६२. गीत
६४. मिठी
६६. अनुमती, मान्यता
६८. टक, दृष्टी
६९. सहाय्य
७०. वारा
७१. बाई, स्त्री
७२. श्वान
७४. मुलांच्या भाषेत मांजर
७५. सिंहाचे पिल्लू

### आडवे उत्तर

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दरामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

### उभे उत्तर

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### ऐतिहासिक मॅच कुठे पाहायची लाईव्ह?

बेलफास्ट–न्यूझीलंड क्रिकेट संघ सध्या आयर्लंडच्या दौऱ्यावर आहे, जिथं दोन्ही संघांमधील एकमेव कसोटी सामना खेळवला जाणार आहे. आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा कसोटी सामना बुधवार, २७ मे रोजी सुरु होईल. हा एक ऐतिहासिक सामना असेल, कारण या दोन संघांमध्ये यापूर्वी कधीही कसोटी सामना खेळला गेलेला नाही. परिणामी, हा सामना अत्यंत रोमांचक होण्याची अपेक्षा आहे. जगभरातील क्रिकेट चाहते याकडे बारकाईनं लक्ष ठेवून आहेत.
सामना किती वाजता सुरु होईल? : आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील एकमेव कसोटी सामना बुधवार, २७ मे रोजी बेलफास्टमधील सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट क्लबमध्ये खेळला जाईल. हा पाच दिवसांचा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरु होईल आणि रात्री ११ वाजण्याच्या सुमारास संपेल.सामना कधी आणि कुठं पाहायचा? : आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील एकमेव कसोटी सामन्याचं थेट प्रक्षेपण भारतातील कोणत्याही टीव्ही चॅनलवर उपलब्ध होणार नाही. वेबसाइटद्वारे या कसोटी सामन्याच्या थेट प्रक्षेपणाचा (लाइव्ह स्ट्रीमिंग) आनंद घेऊ शकतात.

### फिल्डिंगमुळे बुडाली लाज! ग्लेन फिलिप्सने संघाच्या चुका केल्या उघड


मुंबई–गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यावर क्लालिफायर १ चा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात गुजरातच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. आरसीबीच्या संघाने पहिले फलंदाजी करत २५४ धावा केल्या होत्या. प्रतित्युरात जीटीच्या संघाने फक्त १६२ धावा केल्या आणि सामना गमावला. या विजयासह आरसीबीचा संघ हा सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये पोहोचला आहे आणि सलग दुसऱ्यांदा आयपीएलचे विजेतेपदावर त्यांची नजर असणार आहे. आरसीबीच्या संघाने क्वालिफायर १ चा सामना हा ९२ धावांनी जिंकला. आता सामना झाल्यानंतर गुजरात टायटन्सची पत्रकार परिषद पार पडली. यामध्ये जीटीचा फलंदाज ग्लेन फिलिप्स हा संतापलेला पाहायला मिळाला. जीटी विरुद्ध आरसीबी यांच्यामध्ये झालेल्या सामन्यामध्ये जीटीचा पराभव झाला, या सामन्यात जीटीचा पराभव झाला पण त्यांना आणखी एक संधी फायनलमध्ये जाण्याची असणार आहे.

### आरसीबी चा सायलेंट किलर; कॅप्टन बनवण्याची जोरदार मागणी

मुंबई–अनुभवी आंतरराष्ट्रीय फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने एक खळबळजनक दावा केला आहे. त्याच्या मते, रजत पाटीदार आता भारतीय संघाच्या भावी कर्णधारपदाच्या शर्यतीत मुख्य दावेदार म्हणून सामील झाला आहे. देशांतर्गत आणि आयपीएल स्पर्धेतील पाटीदारच्या कामगिरीमुळे निवड समितीसमोरील समीकरणे बदलली असून, त्याने फलंदाज श्रेयस अय्यरला थेट आव्हान दिले आहे. आपल्या यूट्यूब चॅनेलवरील मॲश की बातफ या विशेष कार्यक्रमात बोलताना अश्विनने रजत पाटीदारच्या फलंदाजीचे तांत्रिक विषण केले. विदेशी वेगवान गोलंदाजांविरुद्ध पाटीदारने ज्या पद्धतीने आक्रमक पवित्रा घेतला, त्याचे अश्विनने कौतुक केले.विशेषत: दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाविरुद्ध मारलेल्या एका षटकाराचा उल्लेख करत अश्विन म्हणाला की, मफ्रजतने कागिसो रबाडाविरुद्ध बॅकफूटवर जाऊन मारलेला तो षटकार केवळ त्या दिवसाचाच नव्हे, तर संपूर्ण स्पर्धेतील सर्वोत्तम शॉट होता. त्या पोझिशनमधून त्याने एवढी ताकद कशी निर्माण केली, हे माझे मलाच समजत नाहीये.

# हैदराबादवर मिळवला दणदणीत विजय

## राजस्थानची दुसऱ्या क्वालिफायरमध्ये धडक! ; वैभव सूर्यवंशी-जोफ्रा आर्चर ठरले गेमचेंजर






**नवी दिल्ली:** राजस्थान रॉयल्सने सनरायझर्स हैदराबाद संघावर शानदार विजय मिळवत दुसऱ्या क्वालिफायरमध्ये धडक मारली आहे. २: राजस्थान रॉयल्सने दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात धडक मारली आहे. राजस्थानने सनरायझर्स हैदराबादचा ४७ धावांनी मोठा पराभव केला.

राजस्थानच्या या विजयाचे हिरो ठरले वैभव सूर्यवंशी व जोफ्रा आर्चर. वैभवने सर्वांनाच मंत्रमुग्ध करणारी ९७ धावांची वादळी खेळी केली. तर जोफ्रा आर्चरने ३ महत्त्वाचे विकेट्स घेत राजस्थानचा विजय निश्चित केला. यासह सनरायझर्स हैदराबादचा संघ स्पर्धेतून बाहेर झाला आहे.
गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात दुसरा क्वालिफायर सामना २९ मे रोजी खेळवला जाणार आहे. हा सामनादेखील न्यू चंदीगढमध्ये खेळ–वला जाईल. या सामन्यातील विजेता संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरूद्ध ३१ मे रोजी आयपीएल २०२६ चा अंतिम सामना खेळेल.
राजस्थान रॉयल्सने दिलेल्या २४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरूवात खराब झाली. अभिषेक शर्मा डकवर बाद झाला. त्यानंतर हेड व इशानने संघाचा डाव सावरला. पण इशान किशन मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. इशान ११ चेंडूत ३३ धावा करत बाद झाला. तर हेड १७ धावा व हेनरिक क्लासेन १८ धावा करत माघारी परतला. नितीश कुमार रेड्डी व सलिल अरोरा यांनी संघाचा डाव सावरला पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत.
नितीश रेड्डी व सलिल अरोरा यांनी ५६ धावांची भागीदरी रचली. नितीश रेड्डी ३८ धावा तर सलिल अरोरा ३५ धावा करत बाद झाले. यानंतर शिवांग कुमारने अखेरच्या षटकांमध्ये आर्चरच्या षटकात कमालीचे फटके खेळले. पण अखेरीस संघाला पराभव स्वीकारावा लागला.
राजस्थानकडून आर्चरने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर नांद्रे बर्गर व रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स तर यश राज व सुशांत मिश्रा यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.
याला म्हणतात संस्कार! वैभव सूर्यवंशी सराव सोडून सुनील गावस्कर–संजय बांगर यांना पाहताच पाया पडला; तखऊग्ज व्हायरल
हैदराबादने नाणेफेक जिंकत राजस्थान रॉयल्सला प्रथम फलंदाजीसाठी पाच–ारण केलं. राजस्थानकडून १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने तर धुमाकूळ घातला. वैभव सूर्यवंशीने हैदराबादच्या प्रत्येक गोलंदाजाची धुलाई करत संघाच्या सर्व रणनितींवर पाणी फेरलं. वैभव व यशस्वीने पहिल्या विकेटसाठी ४८ चेंडूत १२५ धावांची भागीदारी रचली. एकट्या वैभव सूर्यवंशीने यामध्ये ९७ धावांचं योगदान दिलं.सर्वात खास गोष्ट म्हणजे तो, वैभव सूर्यवंशीची खेळी पाहून सचिन तेंडुलकर भारावला; ४ वाक्यात सांगितलं सूर्यवंशीच्या यशाचं सीक्रेट
वैभव सूर्यवंशीने या खेळीदरम्यान प्लेऑफमधील सर्वात जलद अर्धशतक १६ चेंडूत अर्धशतक झळकावलं. यानंतर त्याला सर्वात जलद शतक झळकावण्याची संधी होती, पण ९७ धावांवर तो बाद झाला. वैभवने २९ चेंडूत ५ चौकार वन तब्बल १२ षटकार लगावले. यादरम्यान त्याचा स्ट्राईक रेट ३३४.४८ होता. याशिवाय यशस्वी जैस्वाल व रियान पराग यांनी अनुक्रमे २९ धावा व २६ धावांचं योगदान दिलं. तर ध्रुव जुरेलने २१ चेंडूत ५ चौकार व ३ षटकारांसह अर्धशतकी खेळी केली. पण अखेरच्या षटकांमध्ये हैदराबादच्या गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी करत राजस्थानला फारश्या धावा करू दिल्या नाहीत. हैदराबादकडून प्रफुल्ल हिंगेने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर इशान मलिंगा, नितीश कुमार रेड्डी व शिवांग कुमार यांनी १–१ विकेट्स घेतल्या.

# आयपीएलच्या गडबडीत सुरू झाली ऐतिहासिक ४ दिवसांची टेस्ट मॅच

लंडन,२७ मे (पीएसआय)
आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात आज २७ मे पासून इंग्लंडमध्ये टेस्ट मॅचची सुरुवात झाली. दोन्ही संघ चार दिवसाची कसोटी मॅच खेळणार आहेत. त्यानंतर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. इंग्लंडचा संघ बेन स्टोक्स यांच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरणार असून न्यूझीलंडचे नेतृत्व टॉम लॅथम करणार आहेत. तसेच ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातही तीन सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे.
आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा सामना ऐतिहासिक मानला जात आहे कारण रेड–बॉल क्रिकेटमध्ये दोन्ही संघ पहिल्यांदाच एकमेकांविरुद्ध खेळत आहेत. हा पारंपरिक पाच दिवसांचा कसोटी सामना नसून फक्त चार दिवसांचा सामना आहे. हा सामना २७ मे ते ३० मेदरम्यान खेळवला जात आहे. यामुळे अनेक क्रिकेट चाहत्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे की आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात घ्ण मान्यताप्राप्त पारंपरिक पाच दिवसांच्या कसोटी सामन्यापेक्षा हा चार दिवसीय सामना नेमका कसा वेगळा आहे आणि त्याचे नियम काय आहेत.
चार दिवसीय कसोटीचे नियम काय?
चार दिवसांच्या कसोटीचे नियम पारंपरिक पाच दिवसांच्या सामन्यापेक्षा काही प्रमाणात वेगळे आहेत. मात्र दोन्ही संघ दोन–दोन डाव खेळतात आणि सामना जिंकणे, हरणे किंवा ड्रॉ होणे ही मूलभूत रचना समानच असते. जर चार दिवसांच्या अखेरीपर्यंत निकाल लागला नाही, तर सामना ड्रॉ घोषित केला जातो.
या दोन स्वरूपांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे एका दिवसात टाकले जाणारे षटके. पारंपरिक पाच दिवसांच्या कसोटी सामन्यात एका दिवसात किमान ९० षटके टाकणे बंधनकारक असते. तर चार दिवसांच्या कसोटी सामन्यात एका दिवसात किमान ९८ षटके टाकावी लागतात.
याशिवाय फॉलो–ऑनच्या नियमातही बदल आहे. पाच दिवसांच्या कसोटीत फॉलो–ऑन लागू करण्यासाठी २०० धावांची आघाडी आवश्यक असते. मात्र चार दिवसांच्या कसोटीत ही मर्यादा १५० धावांपर्यंत कमी करण्यात आली आहे.चार दिवसीय कसोटी का सुरू करण्यात आली?
२०१७ मध्ये घ्ण ने सदस्य देशांना चार दिवसीय कसोटी सामने खेळण्याची परवानगी दिली होती. यामागचा मुख्य उद्देश लहान क्रिकेट बोर्डावरील आर्थिक भार कमी करणे हा होता. पाच दिवसांच्या कसोटी सामन्यांचे आयोजन खर्चिक ठरत असल्याने छोट्या क्रिकेट बोर्डांना कमी खर्चात कसोटी सामने आयोजित करता यावेत यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता.
आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा सामना कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील केवळ पाचवा चार दिवसीय सामना आहे. पहिला चार दिवसीय कसोटी सामना २०१८ मध्ये पोर्ट एलिझाबेथ येथे दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांच्यात खेळवण्यात आला होता. न्यूझीलंडचा 'ब्लॅक कॅप्स' संघ पहिल्यांदाच या स्वरूपात रेड–बॉल आंतरराष्ट्रीय सामना खेळत आहे. दुसरीकडे आयर्लंडने यापूर्वी इंग्लंडविरुद्ध २०१९ आणि २०२३ मध्ये लॉर्ड्स मैदानावर दोन चार दिवसीय कसोटी सामने खेळले आहेत. तसेच इंग्लंडने मागील वर्षी झिम्बाब्वेविरुद्धही अशाच स्वरूपातील कसोटी सामन्याचे आयोजन केले होते.



## भारतीय संघात रजत पाटीदारला स्थान मिळणार का?

मुंबई–रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाने जे १८ वर्षामध्ये केले नव्हेत ते संघाने रजत पाटीदार यांच्या नेतृत्वाखाली केले. आरसीबीच्या संघाने १८ वर्षामध्ये पहिल्यांदा रजत पाटीदारच्या कॅप्टन्सीमध्ये आयपीएलचे जेतेपद जिंकले. तर संघाने क्वालिफायर १ च्या सामन्यात गुजरात टायटन्सच्या संघाला पराभूत करुन आयपीएल २०२६ ची अंतिम फेरी गाठली आहे. आता संघ फायनलमध्ये सलग दुसऱ्यांदा विजेतेपदाच्या शोधात आहे. मागील दोन वर्षामध्ये रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली आरसीबीच्या संघाने चमकदार कामगिरी केली आहे. आता क्वालिफायर १ मध्ये जीटीविरुद्ध ९२ धावांनी विजय मिळवल्यानंतर आता रजत पाटीदार याच्यासाठी आनंदाची बातमी आहे.
रजत पाटीदार हा मधल्या फळीत फलंदाजी आरसीबीच्या संघासाठी करतो. त्याने मागील दोन वर्षामध्ये आरसीबीसाठी कर्णधार पद तर चांगले सांभाळले आहेच त्याचबरोबर त्याने चांगला फार्म देखील मागील दोन वर्षामध्ये पाहायला मिळाला आहे. त्याने आयपीएल २०२६ च्या चालू सिझनमध्ये २०० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. प्रत्येक संघाला मधल्या फळीत अशा खेळाडूची गरज असते जो यष्टी सांभाळू शकेल आणि वेगाने धावा करू शकेल. आता अनेक वृतांना दावा केला आहे की, सध्याच्या फॉर्ममुळे बीसीसीआय त्याला भारतीय संघात स्थान देण्याचा विचार करण्यास पुन्हा एकदा प्रवृत्त होत आहे. रजत पाटीदारचा मागील दोन वर्षामध्ये फार्म पाहता त्याला आता मधल्या फळीतील मास्टर मानले जात आहे. तो फिरकी गोलंदाजांना चांगले खेळता येते, त्याचबरोबर त्याच्याकडे फिरकी गोलंदाजांच्या गोलंदाजीवर सहजपणे षटकार मारण्याची क्षमता त्याच्यात आहे. त्याने फक्त आयपीएलमध्येच नाही तर देशांतर्गत क्रिकेटमध्ये देखील त्याने प्रभावशाली कामगिरी केली आहे. यामुळेच, मधल्या फळीत फलंदाजी करूनही त्याचा स्ट्राइक रेट २०० पेक्षा जास्त राहतो. त्याने मागील काही वर्षामध्ये देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे, त्यामुळे क्रिकेट चाहते आता त्याला भारतीय संघात जागा देण्याची मागणी करत आहेत. गुजरात टायटन्स विरुद्ध सामन्यात रजत पाटीदार याने ९३ धावा फक्त ३३ चेंडूमध्ये केल्या. याआधी त्याने २०२२ मध्ये देखील दमदार कामगिरी केली होती. त्याने २०२२ मध्ये एलिमिनेटर सामन्यामध्ये ११२ धावा केल्या होत्या. यावरून मोठ्या सामन्यांमध्ये खेळण्याची त्याची क्षमता आणखी सिद्ध होते. आता त्याला भारतीय संघामध्ये खेळण्याची संधी मिळणार की नाही याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

# आयपीएल मध्ये होणार सर्वात मोठा बदल?

मुंबई –जगातील सर्वात लोकप्रिय टी–२० लीग असलेल्या आयपीएलमध्ये आगामी काळात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय)सध्या आयपीएलमध्ये मोठ्या बदलाच्या विचारात आहे. आयपीएल टी–२० लीग दरवर्षी मार्च ते मे दरम्यान आयोजित केली जाते. बीसी–सीआय सध्या भविष्यात दोन टप्प्यांत आयोजित करण्याचा विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे क्रिकेट चाहत्यांना वर्षातून दोनदा आयपीएलचा मनोरंजन पहायला मिळू शकतो.सध्या आयपीएलमध्ये ७४ सामने खेळ–वले जातात. मात्र पुढील काही वर्षात सामन्यांची संख्या वाढवून ९४ करण्याचे विचार केले जात आहे. एवढे सामने सलग दोन महिन्यांत खेळ–वणे कठीण आहे. त्यामुळे स्पर्धेचे वेळापत्रक बदलण्याचा पर्याय समोर आला आहे.
दोन टप्प्यांत होऊ शकते आयपीएल
आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, आयसीसीच्या फ्यूचर टूर प्रोग्राम आणि ब्रॉडकास्टर्ससोबत चर्चा सकारात्मक झाल्यास आयपीएल दोन भागांत खेळवला जाऊ शकतो. प्रस्तावानुसार पहिला टप्पा फ




ेब्रुवारीच्या अखेरीपासून एप्रिलपर्यंत, तर दुसरा टप्पा सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये खेळवला जाण्याची शक्यता आहे.
कधीपासून होणार नवे नियम ?
बीसीसीआय २०२७ नंतरच्या आयपीएलमध्ये हे बदद्ल करण्याच्या विचारात आहे. त्यामुळे २०२८ पासून चाहत्यांना वर्षातून दोनदा आयपीएलचा जल्लोष पाहायला मिळण्याची शक्यता आहे.हंगामा दोन टप्पयात करण्याचे मुख्य कारण काय ?एप्रिल आणि मे महिन्यात भारतातील अनेक भागांत प्रचंड उष्णता आणि दमट हवामान असतो. त्यामुळे खेळाडूंच्या फिटनेस आणि दुखापतींच्या समस्या वाढतात. या हंगामातही अनेक संघांचे खेळाडू दुखापतीमुळे संघातून बाहेर झाले होते. याचा थेट पराभाव संघांवर झाल्याचा दिसला.आयपीएल २०२६ मधील दुखापत खेळाडूचेन्नई सुपर किंग्स: नॅथन एलिस (हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे बाहेर), एम.एस. धोनी (पोटरीच्या स्नायूला ताण आल्यामुळे संपूर्ण हंगाम खेळू शकला नाही), जेमी ओव्हरटन (मांडी), आयुष म्हात्रे (हॅमस्ट्रिंग फाटणे), खलील अहमद (क्वाड्रिसेप्स फाटणे), आणि रामकृष्ण घोष (पायाचे फ्रॅक्चर).
कोलकाता नाईट रायडर्स: हर्षित राणा (गुडघ्याच्या शस्त्रक्रियेमुळे बाहेर), मथिशा पाथिराना (पोटरीच्या स्नायूला ताण), आणि आकाश दीप (पाठीच्या खालच्या भागाला ताण).राजस्थान रॉयल्स: सॅम करन (जांघेच्या दुखापतीमुळे बाहेर) आणि रवी सिंग (त्याच्या जागी इमानजोत चहल).सनरायझर्स हैदराबाद: जॅक एडवर्ड्स (पायाच्या दुखापतीमुळे बाहेर) आणि पॅट कमिन्स (कंबरेच्या स्नायूला ताण). रॉयल चॅलेंजर्स बंगळूर: जोश हेझलवूड (हॅमस्ट्रिंगअकिलीस).मुंबई इंडियन्स: अथर्व अंकोलेकर (गुडघा) आणि रोहित शर्मा (हॅमस्ट्रिंग)सणासुदीचा हंगाम ठरणार फायदेशीर यंदाच्या हंगामात आयपीएलची वीवर्षीप मागील काही हंगामांपासून कमी झाली आहे. त्यामुळे हा नवा नियम आयपीएलला अर्थिक फायदा देऊ शकतो.सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये भारतात सणासुदीचा काळ सुरू असतो. या काळात जाहिराती आणि ब्रँड प्रमोशन मोठ्या प्रमाणात वाढतात. त्यामुळे ब्रॉडकास्टर्स आणि आयपीएल व्यवस्थापनाला मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो.

# ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र सौर पंप योजना राबवा

## आ. अभिमन्यू पवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**औसा/प्रतिनिधी : राज्यातील ग्रामीण भागातील शासकीय पाणीपुरवठा योजनांसाठी शेती पंपाच्या धर्तीवर स्वतंत्र सौर पंप योजना सुरू करण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करत अधिकृत निवेदन सादर केले.**

ooooooooooooooooooo

राज्यात राष्ट्रीय पेयजल योजना, जलजीवन मिशन योजना तसेच इतर योजनांद्वारे बहुतांश गावांमध्ये कायमस्वरूपी शासकीय पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. अनेक गावांमध्ये सार्वजनिक विंधन विहिरी आणि पाणीपुरवठा विहिरींच्या माध्यमातून ग्रामस्थांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र या योजनांच्या विद्युत पुरवठ्यासंदर्भात अनेक गंभीर अडचणी निर्माण होत असल्याचे आ. पवार यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले.सध्या बहुतांश गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र उपलब्ध नसल्याने शेतीपंपाच्या रोहित्रावरच पाणीपुरवठा योजनांचा भार टाकला जातो. त्यामुळे रोहित्रावर अतिरिक्त ताण येऊन ते वारंवार नादुरुस्त होणे, जळणे किंवा कमी दाबाने वीजपुरवठा होणे अशा समस्या उद्भवत आहेत. परिणामी पाणीपुरवठा योजनांचे विद्युत पंप सुरळीत चालत नसल्याने अनेक गावांमध्ये पाणी असूनही नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय पाणीपुरवठा योजनांची वीज देयके थकीत राहिल्यामुळे महावितरणकडून अनेकदा वीजपुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे गावातील नागरिकांना, विशेषतः महिलांना, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरींवर किंवा दूरच्या स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागते. ग्रामीण भागातील ही गंभीर समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र सौर पंप योजना सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे आ. पवार यांनी स्पष्ट केले.या योजनेअंतर्गत सौर उर्जे



वर आधारित स्वतंत्र पंप प्रणाली कार्यान्वित केल्यास दिवसभर अखंडित वीज उपलब्ध राहून पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू ठेवता येतील. तसेच विजेवरील अवलंबित्व कमी होऊन वीजबिलाचा आर्थिक भारही कमी होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात शेतकऱ्यांसाठी महावितरणमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मागेल त्याला सौर पंप' योजनेच्या धर्तीवर गावांच्या शासकीय पाणीपुरवठा योजनांसाठीही स्वतंत्र सौर पंप योजना राबविण्याची मागणी केली आहे.या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागास आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती आ. पवार यांनी दिली.ग्रामीण भागातील नागरिकांना, विशेषतः महिलांना, पिण्याच्या पाण्यासाठी होणारा त्रास कमी करून गावांना शाश्वत आणि अखंडित पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे, असे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

दरम्यान, या मागणीमुळे राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, सौर उर्जेच्या माध्यमातून शाश्वत आणि सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

## आ.अमित देशमुख यांनी केले अ‍ॅड. उदय गवारे यांच्या कुटुंबियांचे सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी:** शेतकरी कामगार पक्षाचे नेते अ‍ॅड. उदय गवारे यांच्या मातोश्री श्रीमती सुलोचना गोवींदराव गवारे यांचे नुकतेच निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी लातूर शहरातील अ‍ॅड. उदय गोविंदराव गवारे यांच्या निवासस्थानी जाऊन सुलोचना गोविंदराव गवारे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केले, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे पुत्र अ‍ॅड. उदय गवारे व गवारे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.

यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे माजी महापौर दीपक सूळ, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, आदिमाया उदय गवारे, अ‍ॅड. अभिलाषा उदय गवारे, डॉ. अनमोल उदय गवारे, मारुती बिरादार, डॉ. श्रीरंग बिरादार, गिरीश ब्याळे, अभिषेक पतंगे, युनूस मोमीन, व्यंकटेश पुरी, महादेव उबाळे, अभिजीत अंकलकोटे, किशोर जाधव, अ‍ॅड. सुनील गायकवाड आदींसह गवारे कुटुंबीय उपस्थित होते.

## लातूर आयएमए दोषी डॉक्टरांना पाठीशी घालणार नाही

### नीट प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी




**लातूर/प्रतिनिधी:** नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून सुरू असलेल्या कारवाईचे इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या लातूर शाखेने स्वागत केले असून या गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयने चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या डॉक्टरांची अत्यंत निष्पक्षपणे आणि सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी संघटनेने शासनास केली आहे. या प्रकरणात ज्या डॉक्टरांचा सहभाग असल्याचा संशय आहे किंवा ज्यांना ताब्यात घेण्यात आले आहे, त्यांना आयएमए कोणत्याही प्रकारे पाठीशी घालणार नाही, असेही स्पष्ट केले आहे.

अशा कोणत्याही बेकायदेशीर व अनैतिक कृत्याचा संघटना निषेध करीत असून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि वैद्यकीय क्षेत्राच्या विश्वासार्हतेशी

खेळणाऱ्या दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी सीबीआयने कोणत्याही दबावाशिवाय या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन निष्पक्ष चौकशी करावी अशी मागणी केली आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षांची विश्वासार्हता टिकून राहणे देशाच्या आरोग्य व्यवस्थेसाठी अत्यंत गरजेचे आहे. पात्र आणि कष्टकरी विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे समर्थन आयएमए कधीही करणार नाही असे लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत ,सचिव डॉ. विश्रांत भारती, वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. श्वेता काटकर पवार, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी अवस्थी यांनी सांगितले. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखेने राज्य स्तरावर हा निर्णय घेतला असून लातूर शाखेनेही या निर्णयाचे स्वागत केल असल्याचे डॉ. राऊत व डॉ. भारती यांनी सांगितले.

## ग्रामीण टी १० अंतिम सामना चाकूर चार्जरने जिंकून ट्रॉफीवर आपले नाव कोरले

### धिरज विलासराव देशमुख व सौ दीपशिखा धिरज देशमुख यांच्या हस्ते ट्रॉफीचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी:** लोकनेते विलासराव देशमुख ग्रामीण टी-१० क्रिकेट स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.मंगळवार दि.२६ मे रोजी लातूर लायन्स विरुद्ध चाकुर चार्जस या दोन संघात अंतिम सामना खेळवला गेला.

यामध्ये चाकूर चार्जस संघाने अप्रतिम खेळी करत विजय संपादन केला. प्रथम विजयी संघाचे कॅप्टन डॉ धनंजय पडवळ यांना रोख २,२१,००० रू.उपविजेता संघाचे कॅप्टन विशाल गायकवाड यांना १,११,००० रू. व मालीका विर एम डी मोहम्मद यांना ३१००० रू. पारितोषिक व ट्रॉफी देवून गौरवण्यात आले.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून







आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला मागील ३ वर्षांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. यंदा स्पर्धा नव्या स्वरूपात होत आहेत. लातूर लायन्स विरुद्ध चाकुर चार्जस या दोन संघात अंतिम सामना २५ मे रोजी होणार होता.मात्र पाऊस पडल्या कारणाने हा अंतिम सामना २६ रोजी खेळवण्यात आला.

२५ मे रोजी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख व सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांच्या हस्ते वुमेन्स लातूर सीटी किंग्ज संघाला विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा धिरज देशमुख, वंश धिरज देशमुख, दिवियाना धिरज देशमुख यांच्या हस्ते महिला संघाची कॅप्टन क्षितीजा लोमटे यांना २१,०००/- रू व ट्रॉफी देवून गौरविण्यात आले.

तसेच युवा फाऊंडेशन तर्फे रोहन एनाडले यांना १,२१,०००/- रू. लोकनेते विलासराव देशमुख स्पोर्ट्स स्कॉलरशीपचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी २५ मे रोजी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा धिरज देशमुख, वंश धिरज देशमुख, दिवियाना धिरज देशमुख यांच्या हस्ते 'चषकाचे' अनावरण करण्यात आले. या स्पर्धेत १२ संघ सहभागी झाले होते.या दरम्यान तरुणांचा उत्साह प्रचंड राहीला व प्रेक्षकही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहीले याबद्दल आयोजन समितीने सर्वांचे आभार मानले.

## लातूर जिल्ह्यात शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

### 'स्वाधार' योजनेसाठीही वसतिगृहाचा अर्ज बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये लातूर शहरात मुलांचे ६ तर मुलींचे ४ वसतिगृह; औसा, निलंगा, उदगीर, देवणी व चाकूर येथे प्रत्येकी मुलांचे १ व मुलींचे १; अहमदपूर येथे मुलांचे २ व मुलींचे २; तर रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह कार्यरत आहे. या सर्व वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यासाठी https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.या प्रवेश प्रक्रियेत जिल्ह्यात इयत्ता आठवी व अकरावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या, तसेच बिगर व्यावसायिक पदवी, पदविका (डिप्लोमा) प्रथम वर्षात आणि पदव्युत्तर प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) प्रवेश अर्ज भरता येईल. याशिवाय थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना (इयत्ता ८ वी) ३० जून, २०२६ पर्यंत, तर कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १५ जुलै, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

या शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांचा जर जागेअभावी वसतिगृहात प्रवेश निश्चित झाला नाही, तर अशा पात्र विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा ऑनलाईन पद्धतीने लाभ देण्यात येणार आहे. त्यासाठी वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने वर्ग केले जाणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाचा मूळ अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा स्वतंत्र अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये कोणतीही सुविधा देण्यात येणार नाही आणि पर्यायाने त्यांना स्वाधार योजनेचा लाभही मिळणार नाही. तरी इच्छुकांनी मुदतीपूर्वी ऑनलाईन लिंकचा वापर करून, तसेच स्थानिक गृहप्रमुख किंवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधून आपले प्रवेश अर्ज निश्चित करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी:** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३ जून, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी नागरिकांच्या घेतल्या भेटी

**लातूर/प्रतिनिधी:** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.



यावेळी माजी महापौर दीपक सुळ, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, वेंकटेश पुरी, गोविंद देशमुख, सुशील वाघमारे, गिरीश माने, रोहित माने, बापुराव देशमुख, अनिता कांबळे, परमेश्वर साळुंखे, वसंत शिंदे, बिभीषण घोडके, गोविंद कांबळे, धनराज पवार, डॉक्टर शशिकांत कुकाले, प्रीती कांबळे, संदीप सूर्यवंशी, शोभा ओहाळ, आशा धावारे, शंकर धावारे, रामराव मोरे, संदीप सूर्यवंशी, दिलीप कदम, सुधाकर माने, गणेश सूर्यवंशी, लक्ष्मण अंकुशे, उद्धव देशमुख, विनोद शिंदे, दिनेश कांबळे, गंगाधर जाधव, ज्योती देशमुख, जया डोपे, शीला श्रीरामे, निशा गायकवाड, सुरेखा ननावरे, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांची पूर्तता: भारत जागतिक शक्ती म्हणून उदयास

**लातूर/प्रतिनिधी :** देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले.

देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मोदींजींनी मागील १२ वर्षांत केलेले कार्य खूप मोठे आहे.



एका पुस्तकात ते कार्य मांडणे खूप कठीण काम आहे. देशातील तळागाळातील शेवटच्या माणसाला सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी मोदींजींनी सतत प्रयत्न केले. हर घर शौचालय, उज्वला गॅस योजना यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. सरकारच्या अनुदानावर जनतेला न ठेवता गरीब केंद्रित अजेंडा त्यांनी राबवला. त्याचाच परिणाम म्हणून मागील १० वर्षांत २५ कोटी जनतेला गरिबीतून बाहेर काढण्यात सरकारला यश आले. भारताचा ऋळ्ड २०१३-१४ मध्ये १०३ लाख कोटी होता तो २०२५-२६ मध्ये ३५७ लाख कोटींपर्यंत म्हणजेच तिप्पट वाढवला. महाराष्ट्राचा ऋळ्ड २०१३-१४ मध्ये १३ लाख कोटी इतका होता तो २०२५-२६ पर्यंत ५४ लाख कोटी इतका वाढवला. हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. पंतप्रधान मोदींजींचे १२ वर्षांत केलेला देशाचा विकास हा फक्त घोषणांनी झालेला नाही, तर त्यामागे त्यांची विकासाभिमुख नियोजनबद्ध रणनीती हे मुख्य कारण आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मोदीजींच्या कार्यकाळाला 'राष्ट्रनिर्माणाचा सुवर्णकाळ' म्हणून केले अधोरेखित

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने केवळ विकास केला नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श उभा केला आहे. आजचा भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा, डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम झालेला, उद्योगशील आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा समर्थ राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी राष्ट्र निर्माणाची तपपूर्तीया विशेष संग्राह्य अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात काढले. राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती म्हणजे खरंतर देशाच्या जनतेने अनुभवलेला परिवर्तनाचा इतिहास आहे, असे सांगत रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, गेल्या एका तपामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात घडलेला बदल प्रत्येक भारतीयाने अनुभवला आहे. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली. पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला.

देशातील गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. एक भारत, अखंड भारतते विकसित भारतया प्रवासातील परिवर्तनाची १२ विषयांवरील तथ्यपूर्ण मांडणी या विशेष अंकातून करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. या विशेष संग्राह्य अंकामध्ये अखंड भारत, अंत्योदय, सुरक्षित भारत, युवा भारत, मातृप्रधान भारत अशा विषयांपासून विज्ञान, उद्योग आणि विकसित भारत २०४७ यावर विशेष प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारताने जागतिक स्तरावर निर्माण केलेला प्रभाव, सीमांवर शत्रूला दिलेले सडेतोड उत्तर आणि जगातील संकटसमयी मानवतेसाठी धावून जाणारा संवेदनशील भारत यांचेही या अंकात दस्तावेजीकरण करण्यात आले आहे.

राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती हा केवळ स्मरणिका नसून नव्या भारताच्या परिवर्तनाचा साक्षीदार ठरणारा ऐतिहासिक दस्तावेज असल्याचे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले. काही व्यक्ती अध्यात्मातून तपस्या करतात, काही कला आणि साहित्याच्या माध्यमातून समाजासाठी जगतात; पण मोदीजींनी स्वतःला राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले आहे. म्हणूनच ते राष्ट्र तपस्वी आहेत, असे सांगत मोदीजींच्या कार्याची पुस्तकरूपी माहिती जनतेला संकलित स्वरूपात द्यावी, या उद्देशाने राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती हा विशेष संग्राह्य अंक प्रकाशित करण्यात आल्याचेही प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## शिवपूर येथे भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

### ह .भ .पा .कृष्णा महाराज पंढरपूरकर यांची उपस्थिती

**अजगर मजकुरी/ शिरूर अनंतपाळ :** शिवपूर ता . शिरूर अनंतपाळ येथे श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा गुरुवार ता .२८ पासून सुरू होत असून यात हभप बळीराम महाराज शिवपूरकर , सोपान महाराज हुडगेवाडी , लिंबराज महाराज शिवपूरकर , सचितानंद महाराज पंढरपूरकर , केशव महाराज धामणगावकर , उद्धव महाराज रमजानपूरकर, बंडा महाराज अलगरवाडी , माणिक महाराज उजनीकर यांचे किर्तन होणार आहे . व परिसरात भजनी मंडळाची उपस्थिती राहणार आहेत तरी ग्रामस्थ व परिसरातील नागरीक, भाविक भक्ता नी लाभ घ्यावा असे आव्हान बाबूराव व्यंका सुर्यवंशी तसेच शिवपूर ग्रामस्थाच्या वतीने करण्यात आले आहे' सिंथ वादक ' हरिभाऊ पांचाळ चापोली ' मृदंगाचार्य महेश पांचाळ शिवपूरकर ' यांची साथ संगत मिळणार आहे तरी सर्व परिसरातील भावीक भक्तानी या कथेचा व किर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा.



लातूर समाचार
रोज वाचा ऑनलाईन वर..
www.latursamachar.com

## इंस्टाग्राम रील-स्टार 'क्वीन' स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मालमत्तेविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. गुन्हेगारांवर बारकाईने नजर ठेवून तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार व सततची गस्त याच्या माध्यमातून गुन्हे उघडकीस आणण्याचे काम सुरू असतानाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या कॉपर वायर चोरीच्या गुन्ह्यात कारवाई करत एका महिला आरोपीस जेरबंद करून तिच्याकडून ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले आहे.



दि. २७/०५/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वात पोउपनि प्रमोद देशमुख यांचे पथक लातूर शहर परिसरात संशयितांची पडताळणी व गुन्हेगारांची माहिती घेत होते दरम्यान दुपारी १३.२० वाजण्याच्या सुमारास पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, यशवंत शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील रस्त्याच्या कडेला एक महिला चोरीच्या कॉपर वायर विक्रीतून मिळालेली रक्कम घेऊन संशयास्पदरित्या थांबलेली आहे. तसेच सदर महिला वारंवार कॉपर वायर चोरी करून भंगार विक्रेत्यांना विक्री करत असल्याची माहिती मिळाली. प्राप्त माहितीनुसार पोलिस पथकाने सापळा रचून वर्णनाप्रमाणे एक महिला संशयित अवस्थेत उभी असल्याचे दिसून आली. महिला पोलीस अंमलदारामार्फत तिला ताब्यात घेऊन तिची चौकशी करण्यात आली असता तिने आपले नाव प्रिया वय १९ वर्षे, रा. विलास नगर, लातूर असे सांगितले.त्यानंतर तिच्या ताब्यातील लाल रंगाच्या पिशवीची झडती घेण्यात आली असता त्यामध्ये रोख रक्कम आढळून आली. सदर रक्कमेबाबत विश्वासात घेऊन चौकशी केली असता तिने प्रकाश नगर परिसरातील बुद्धविहारासमोरील सुरू असलेल्या बांधकाम ठिकाणावरून लाईटचे कॉपर वायर चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेले कॉपर वायर तिने फिरत्या भंगार विक्रेत्यांना विक्री करून त्यातून मिळालेली रक्कम स्वतःजवळ ठेवल्याचे तिने सांगितले.

त्यानंतर लातूर जिल्हा पोलीस अभिलेखाची पडताळणी करण्यात आली असता पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी., लातूर येथे गुरनं २७२/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये कॉपर वायर चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. महिला प्रिया हिच्या ताब्यातून चोरीच्या कॉपर वायर विक्रीतून प्राप्त झालेले एकूण ४१,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर महिला आरोपीस ताब्यात घेऊन पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी तिला एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेसंदर्भात अधिक माहिती घेतली असता इंस्टाग्राम वर क्वीन रील स्टार नावाने प्रसिद्ध असलेली ही तरुणी तिचे जवळपास ३२ हजार फॉलोवर्स असल्याचे आढळून आले.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वातील पथका मधील पोउपनि प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे तसेच महिला पोलीस अंमलदार मदने यांनी केली आहे.

## गवारे कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी :** शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस ॲड. उदय गोविंदराव गवारे यांच्या मातोश्री सुलोचना गोविंदराव गवारे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले होते त्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी बुधवारी त्यांच्या लातूरात घरी जाऊन मातोश्रींच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली अँड गवारे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

याप्रसंगी अँड उदय गवारे डॉ गवारे अंड शिंदे, राज्य साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील,मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोकअप्पा काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील अनुप शेळके मारुती पांडे बसवंत भरडे प्रा गोविन्द घार संभाजी रेड्डी संभाजी सुळ, सुपर्ण जगताप,बाळासाहेब जाधव आदी उपस्थित होते.

## घर फोडून सोने-चांदीसह रोकड लंपास

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील जुना औसा रोडवरील एका घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घर साफ केल्याची घटना १३ ते २६ मेच्या दरम्यान घडली. सोने-चांदीसह अज्ञात चोरट्यांनी रोकड असा ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अण्णासाहेब रावसाहेब साठे (वय ५५० रा. देशपांडे कॉलनी, जुना औसा रोड) हे १३ मे पासून मुलगा आणि पत्नीकडे बाहेर गावी गेले होत. २६ मे रोजी ते परतले असता घराचे मेन गेटचे कुलूप तोडले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात प्रवेश केला असता बेडरुम व स्टडी रुममधील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम व इतर सामान असे एकुन ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सोने-चांदीच्या दागिण्यासह २६ हजार रोकड व जुने तीन मोबाईल चोरीला गेले आहेत. पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे मार्गदर्शनाखाली पोहे बुधोडकर अधिक तपास करीत आहेत.

### भाववाढ ..

दरवाढ टप्पा टप्पा
भार हळूहळू थोडा
सगळे सर्वसामान्य
ओढत राहती गाडा

डोस द्यावा गुपचुप
पाजे कडवट काढा
सहनशीलता सावरे
अंमळसे दम काढा

महागाई विद्रुपभारी
विचकावे क्रौर्यदाढा
आपल्यावरीआरिष्ट
रे जनते वरती धाडा

उध्वस्त करेआरोग्य
पोखरी खोल किडा
भरडले जावो कुणी
जीवनी खेळा क्रिडा

जनआंदोलन उभारे
अस्वस्थ कुणी वेडा
राज कारणी स्वार्थी
घालती भोवती वेढा

आपत्तीही जागतिक
ऐक्याने द्यायचालढा
धक्केकायम खातचं
अविचल राहतोखडा

प्रथा पडूनये ही मात्र
सोसणा-याला पिडा
चुकीचे काही घडता
खुशाल जुटीने भिडा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## हास्यातून उलगडणारा लोकनेता विलासरावांचे १०० लोकप्रिय किस्से ग्रंथाचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर प्रतिनिधी:- बुधवार, दि.२७ मे २०२६ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते बुधवार दि.२७ मे रोजी सायंकाळी बाभळगाव निवासस्थानी माजी मुख्यमंत्री,माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी पवनकुमार गायकवाड यांनी संपादकीय/संकलक केलेल्या हास्यातून उलगडणारा लोकनेता विलासरावांचे १०० लोकप्रिय किस्से ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी विलास को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन ॲड. किरण जाधव,व्हा. चेअरमन ॲड. समद पटेल,लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर कैलास कांबळे,गणेश एसआर देशमुख, ॲड.फारुख शेख, शाहबाज खान,जुबेर शेख आदी उपस्थित होते.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी नामांकित कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** विप्रो ह्या जागतिक कंपनी यांच्या वतीने दयानंद लिक्षण संस्था,लातूर द्वारा संचाललत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे नुकताच कॅम्पस इंटरव्ह्यू ड्राइव्ह उत्साहात पार पडला. ही कंपनी पुण्यात एक मोठा जीवन विज्ञान आणि आरोग्यसेवा विभाग चालवते. ही कंपनी जागतिक औषधनिर्माण क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांना आयटी, एआय आणि डिजिटल सल्ला सेवा पुरवते, ज्यामध्ये प्रामुख्याने क्लिनिकल डेव्हलपमेंट, फार्माकोव्हिजिलन्स (औषध सुरक्षा) आणि नियामक अनुपालनावर लक्ष केंद्रित केले जाते.

या उपक्रमुळे अंतिम वर्षातील ऐम.फार्मसी,बी.फार्मसी व डी.फार्मसीच्या विद्यार्थीनी या क्षेत्रात नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली. हा कॅम्पस इंटरव्ह्यू ड्राइव्ह Enquti Technologies (Enqub Pharma,Pune) यांचा सहयोगाने घेण्यात आला.



कायमक्रांच्या प्रारंभी कंपनीच्या श्री. शार्दूल भोसले ,एच आर चरपरसशी यांचा सत्कार करण्यात आला. या कॅ म्पस ड्राइव्हहसाठी कं पनीचे मानव संसाधन विभागाचे अधिकारी व तांत्रिक तज्ञ उपस्थित होते.

निवड प्रक्रियेत प्रथम लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आदी विषयांवर आधारित तांत्रिक मुलाखत घेण्यात आल्या.मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची संवादकौल्यि,आत्मविश्वास व कायमक्षर्तेचे मूल्यमापन करण्यात आले.

या निवड प्रक्रियेत व स्पधामत्क वातावरणात गुणवत्तेच्या आधारे ५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यां मध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कॅम्पस ड्राइव्ह च्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय याच्या वतीने अनिल बिरादार (टी.पी.ओ. दयानंद लिक्षण संस्था),प्रा.रोहत सारडा (टी.पी.ओ.दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी), डॉ.बालाजी शेटकर, प्रा. बिराजदार,प्रा. वारद यांचे योगदान लाभले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी उद्योग- शिक्षण दुवा अधिक मजबूत करण्यासाठी अशा उपक्रांचे सातत्याने आयोजन केले जाईलअसे सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण क्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव श्री. बियाणी,सहसचिव विशाल लाहोटी,सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते विभागप्रमुख व प्राध्यापक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६